


# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३८२ वा गुरूवार दि ०४ जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

## खरा गेम अद्याप बाकी भाजपचं मिशन ३६२, ममता बॅनर्जींवर संकट...

**वृत्तसंस्था कोलकाता**

पश्चिम बंगालच्या राजकारणात गेल्या २४ तासांत वेगवान घडामोडी घडल्या आहेत. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस मध्ये उभी फूट पडली आहे. पक्षाचे ८० पैकी ६० आमदार ममतांपासून दुरावले आहेत. या आमदारांनी ऋतब्रत बॅनर्जी यांची निवड विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून केली आहे. विधानसभा अध्यक्षांनी या गटाला मान्यता दिल्यानं ममतांना जबर धक्का बसला आहे. ममता बॅनर्जी यांनी ज्या बंडखोर आमदाराला पक्षाबाहेर केलं, त्यालाच पक्षाच्या ६० आमदारांनी पाठिंबा दिला आहे. यानंतर आता तृणमूल काँग्रेस संकटात आहे. ममता बॅनर्जी यांच्या हातून पक्ष जाण्याची शक्यता दिसू लागली आहे. ममता बॅनर्जी १५ वर्षे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री होत्या. पण सत्ता जाताच त्यांचा पक्ष कोलमडला आहे. विधानसभा निवडणुकीत तृणमूलला ८० जागांवर यश मिळालं. पण निकालानंतर महिनाभरातच पक्षात मोठं बंड झालं आहे. आमदार फुटीनंतर आता खासदार फुटण्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठं बंड केलं. सेनेचे ४० आमदार त्यांच्या सोबत गेले. आमदारांपाठोपाठ खासदारांनीदेखील शिंदेसेनेची वाट धरली. आता तोच प्रयोग तृणमूलमध्ये होण्याची दाट शक्यता आहे. आमदारांनंतर खासदारांनी साथ सोडल्यास ममता बॅनर्जी यांचं दिल्लीतील राजकीय कमी होईल. सोबतच त्यांच्या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षांना धक्का बसेल. तृणमूल काँग्रेसमधील लोकशाही कार्यप्रणाली आणि नेतृत्व यावरुन सुरू झालेल्या संघर्षामुळे पक्षाची दोन शकलं होऊ शकतात, असं भाजपच्या नेत्यांना वाटतं. तृणमूलचे दोन तुकडे झाल्यास संसदेत एक नवा राजकीय गट अस्तित्वात येईल. हा गट मुद्द्यांच्या आधारावर केंद्र सरकारला पाठिंबा देऊ शकतो, असं भाजपच्या नेत्यांनी सांगितल्याची माहिती इंडियन एक्स्प्रेसनं दिली आहे. तृणमूल काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या घडामोडी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या फुटीसारख्याच आहेत. या दोन पक्षातील फूट भाजपच्या पथ्थ्यावर पडली. आपचे राज्यसभेतील १० पैकी ७ खासदार फुटले. ते भाजपमध्ये गेले. आता तृणमूलमधील फूटदेखील याच मार्गानं जाण्याची शक्यता आहे. मतदारसंघ पुनर्रचनेसारखी महत्त्वाची विधेयकं मंजूर करण्यासाठी भाजपला संसदेत दोन तृतीयांश खासदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. विधेयक मंजूर झाल्या, लोकसभेची सदस्यसंख्या ५४५ हून ८५० वर जाईल. एप्रिलमध्ये सरकारनं लोकसभेत विधेयक मांडलं. पण दोन-तृतीयांश खासदारांचा पाठिंबा न मिळाल्यानं विधेयक नामंजूर झालं. १२ वर्षांत पहिल्यांदाच मोदी सरकारवर नामुष्की ओढवली. लोकसभेत एनडीएचे २९२ खासदार आहेत. दोन तृतीयांश बहुमतासाठी ३६२ चा आकडा महत्त्वाचा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मिशन ३६२ वर काम करत आहेत.



तामिळनाडूची सत्ता गमावलेल्या द्रमुकला सोबत घेण्याच्या हालचाली सुरू आहेत. काँग्रेस, तृणमूल, द्रमुक यांच्यासह इंडिया आघाडीनं मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला कडाडून विरोध केला होता. त्यावेळी विधेयकाच्या विरोधात २३० खासदारांनी मतदान केलं होतं. सध्याच्या घडीला लोकसभेत तृणमूलचे २८, तर द्रमुकचे २२ खासदार आहेत. द्रमुकसारख्या पक्षानं मुद्यांच्या आधारावर मोदी सरकारला पाठिंबा दिला, तृणमूलमधील मोठा गट एनडीएमध्ये आल्यास घटनात्मक सुधारणांसाठी आवश्यक असलेलं दोन तृतीयांश बहुमत गाठता येऊ शकेल, असं भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना वाटतं. त्यामुळे बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसमध्ये सुरू असलेला संघर्ष केवळ राज्यापुरता मर्यादित नाही. त्याचे दूरगामी परिणाम राष्ट्रीय राजकारणावर आणि संसदेतील समीकरणांवर पडू शकतात.

## विक्रम संजय काकडेंची मालमत्ता १५० करोड, दुबईत आलिशान फ्लॅट, जय पवारांना १० कोटींचं कर्ज दिल्याचं उघड

**वृत्तसंस्था पुणे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात ऐन वेळी प्रवेश करून तिकीट मिळविलेल्या आणि त्यावरून नाराजीनाट्य सुरू झालेल्या विक्रम संजय काकडे यांची सुमारे दीडशे कोटी रुपयांची मालमत्ता असल्याचे प्रतिज्ञापत्रातून स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे विविध व्यक्तींसह कंपन्यांना विक्रम यांनी कर्ज म्हणून रक्कम दिली असून, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र आणि राष्ट्रवादीचे नेते जय पवार यांना १० कोटी रुपयांचे कर्ज दिल्याचे उघड झाले आहे. पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून काकडे निवडणूक लढवित आहेत. त्यांनी जाहीर केलेल्या प्रतिज्ञापत्रात जय पवारांना १० कोटींच्या कर्जाशिवाय परवेज ग्रँट यांना दोन कोटी १७ लाख रुपये; तसेच रुस्तुम भरोचा, श्रीशा एंटरप्रायझेस, काकडे प्रमोटर्स, काकडे डेव्हलपर्स, राज डेव्हलपर्स यांसारख्या व्यक्ती आणि कंपन्यांना सुमारे ४० कोटी ९५ लाख रुपयांचे कर्ज दिल्याची बाब उघड झाली आहे. एकूण दीडशे कोटी रुपयांच्या मालमत्तेमध्ये विविध बँकांसह शेअर, विमा, पोस्टामध्ये गुंतवणूक, ४१० ग्रॅम सोने, पाच किलोहून अधिक चांदी, आलिशान घड्याळे, मोटार कार, आलिशान बोटी यांसारख्या साधनांचा समावेश आहे. बांधकाम क्षेत्रात १५ कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. काकडे यांच्याकडे साडेसात लाख रुपयांची रोख रक्कम आहे. विविध बँकांमध्ये २९ लाख ५३ हजार ६२९ रुपयांची रक्कम त्यांच्या नावे आहे. विक्रम यांच्यावर ४१ कोटी ८० लाख २७ हजार ७६१ रुपयांचे कर्ज आहे. ५० लाख रुपये किमतीची परवाना असलेली हत्यारे त्यांच्याकडे आहेत. अशी एकूण ७८ कोटी ९५ लाख ६५ हजार ५३१ रुपये किमतीची जंगम मालमत्ता आहे. मावळ तालुक्यात दोन ठिकाणी आणि मुंढवा येथे जमिनी, पाषाण येथे ४५४४ चौरस फूट क्षेत्रफळ इतकी सदनिका; तसेच त्याच इमारतीत तेवढ्याच आकाराची सदनिका पत्नी देविका यांना विक्रम यांनी गिफ्ट केली आहे. दुबईमध्ये आलिशान सदनिका आहे. एकूण ७४ कोटी सात लाख रुपयांची मालमत्ता विक्रम काकडे यांच्याकडे, तर पत्नी देविका यांच्या नावावर नऊ कोटी १९ लाख रुपयांची मालमत्ता आहे. आठ कोटी ३९ लाख रुपयांचा प्राप्तिकर त्यांच्याकडे थकीत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीकांत पाटील यांच्याकडे दोन लाख रुपये, तर पत्नीकडे ४० हजार आणि आईकडे २५ हजार रुपयांची रोख रक्कम आहे. पाटील यांच्याकडे दोन तोळे, तर त्यांच्या पत्नीकडे ५० तोळे सोने आणि आईकडे पाच किलो चांदी आहे.



पाटील यांच्याकडे कुटुंबाची मिळून एकूण एक कोटी आठ लाख रुपयांची जंगम मालमत्ता आहे. आई आणि कुटुंबाच्या नावावर तळेगाव दाभाडे येथे १७ एकर जमीन आहे. बोपोडी येथे बिगर शेतजमीन आहे. निवासी इमारती आहेत. जमिनी आणि घरे ही वडिलोपार्जित आहेत. त्याची एकूण किंमत ३७ कोटी १० लाख रुपये असल्याचे प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

# भीतीपेक्षा भूक मोठी



उन्हाळा सुरू झाला की गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, धुळे, नंदुरबार आणि महाराष्ट्रातील अनेक आदिवासी भागांमध्ये जंगल पुन्हा जिवंत होते. हातात दोरी, डोक्यावर टोपल्या आणि अंगावर उन्हाचा तडाखा घेऊन हजारो महिला, पुरुष आणि तरुण जंगलाच्या दिशेने निघतात. कारण सुरू होतो तेंदूपत्ता संकलनाचा हंगाम. तेंदूपत्ता हे केवळ वनउत्पादन नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहे. मात्र या संपूर्ण वास्तवामागे एक अतिधोकादायक बाजूही आहे. ती म्हणजे, जंगलातील वन्यजीवांचा धोका. महाराष्ट्रात तेंदूपत्ता संकलन मुख्यतः सात वनवृत्तांमध्ये होते. हे भाग प्रामुख्याने विदर्भ आणि काही मराठवाडा विभागात आहेत. मुख्यतः गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, नागपूर, अमरावती, यवतमाळ, धुळे, नंदुरबार आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांत तेंदूपत्ता संकलन केले जाते. यात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्र, पेंच व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्र, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प , बोर अभयारण्य, टिपेश्वर अभयारण्याचा भाग यांचा अंतर्भाव आहे. गडचिरोली, चंद्रपूर आणि गोंदिया हे जिल्हे तेंदूपत्ता उत्पादनाचे प्रमुख केंद्र आहेत. धुळे आणि नंदुरबारमध्ये मर्यादित प्रमाणात संकलन होते. छत्रपती संभाजीनगरमध्ये हे प्रमाण तुलनेने कमी आहे. या सात वनवृत्तांमध्ये मागील हंगामात अंदाजे १.७ ते १.८ लाख स्टँडर्ड बॅग तेंदूपत्ता संकलनाचे उद्दिष्ट होते. एक स्टँडर्ड बॅग म्हणजे एक हजार पुडे. प्रत्येक पुड्यात ७० पाने याप्रमाणे ७० हजार तेंदू पाने. मजुरी/दर वन विभाग किंवा अधिकृत एजंट संकलकांना प्रति स्टँडर्ड बॅग ठरावीक दर देतात. पूर्वीच्या अधिकृत दरांनुसार गडचिरोली भागात जास्त दर होते. चंद्रपूर, नागपूर, यवतमाळ जिल्ह्यांत मध्यम; तर, धुळे, नाशिक, पुणे भागात तुलनेने कमी दर होते. काही वर्षांत हा दर १ हजार ५०० रुपये ते २ हजार ४०० रुपये प्रति स्टँडर्ड बॅगपर्यंत गेला आहे. तसेच तेंदूपत्त्याच्या दर्जानुसार किंमत ठरविली जाते. बिडी उद्योगाला मोठे आणि पातळ, पण मजबूत पान जास्त पसंत असते. त्यामुळे गडचिरोली, चंद्रपूरचा तेंदूपत्ता देशात चांगल्या गुणवत्तेचा मानला जातो. महाराष्ट्रात दर वर्षी तेंदूपत्ता व्यापारातून अंदाजे २०० ते ५०० कोटी रुपयांची उलाढाल होते. या व्यवसायावर आदिवासी कुटुंबांसह बिडी उद्योग, व्यापारी, वाहतूकदार, गोदाम मजूर, स्थानिक बाजारपेठा आणि हजारो हंगामी मजूर अवलंबून आहेत.

राज्यात तेंदूपत्ता संकलन वनविभागामार्फत, वनहक्क कायदा अंतर्गत ग्रामसभांमार्फत आणि पेसा कायदाक्षेत्रातील ग्रामसभांमार्फत अशा तीन प्रमुख व्यवस्थांद्वारे केले जाते. अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ अंतर्गत ग्रामसभांना लघु वनउपजांवरील अधिकार दिले आहेत. वनहक्क कायद्याच्या कलम ३ (१) (सी) नुसार ग्रामसभांना तेंदूपत्ता, बांबू, मोह, लाख, मध यांसारख्या लघु वनउपजांवर स्वामित्व, संकलन, वापर आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. तर, कलम ५ अंतर्गत ग्रामसभेला जंगल संवर्धन, जैवविविधता संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांच्या शाश्वत व्यवस्थापनाचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे अनेक गावांमध्ये ग्रामसभा थेट तेंदूपत्ता संकलन, साठवण, विक्री, वाहतूक परवाने, मजूर समन्वय यांचे व्यवस्थापन करतात. विशेषतः गडचिरोली जिल्ह्यातील अनेक ग्रामसभांनी तेंदूपत्ता आणि बांबू विक्रीतून लाखो रुपयांचा ग्रामनिधी उभारला आहे. या निधीतून ग्रामविकास, पाणीपुरवठा, शिक्षण आणि जंगल संरक्षणाची कामे केली जात आहेत. अनुसूचित क्षेत्रांमधील पेसा कायद्यामुळे ग्रामसभांना नैसर्गिक संसाधनांवरील निर्णयक्षमता मिळाली आहे. लघु वनउपजांवरील मालकी हक्क ग्रामसभेकडे राहतील, असे स्पष्टपणे या कायद्यात नमूद आहे. ग्रामसभेला समुदाय संसाधनांचे संरक्षण आणि पारंपरिक व्यवस्थापनाचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे गडचिरोली, धुळे, नंदुरबार आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील अनेक अनुसूचित क्षेत्रांमध्ये ग्रामसभा तेंदूपत्ता संकलनात सक्रिय भूमिका बजावतात. तेंदूपत्ता हा फक्त जंगलातील पानांचा व्यापार नाही. तो हजारो आदिवासी आणि वनाधारित कुटुंबांच्या जगण्याचा आधार आहे. अनेक गावांमध्ये आजही लोक ङ्गतेंदूपत्ता आला म्हणजे घरात पैसा आलाफ असे म्हणतात. एप्रिल आणि मेमध्ये शेतीची कामे जवळपास थांबलेली असतात. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित असतात. अशा वेळी तेंदूपत्ता हा वर्षातील सर्वांत मोठा रोख उत्पन्नाचा स्रोत ठरतो. गोंड, माडिया, कोलाम, भील, पावरा, कोरकू यांसारख्या आदिवासी समाजांसाठी हा हंगाम म्हणजे वर्षभराच्या आर्थिक गरजा भागवण्याची संधीच. घरातील सर्व सदस्य या कामात सहभागी होतात. महिला पत्ता तोडतात, पुरुष गड्ड्या बांधतात. फळीवर (तेंदू संकलन केंद्र) पुडे जमा करतात आणि त्याची नोंद चेकर त्याच्या रजिस्टरमध्ये तसेच कुटुंबाच्या पुस्तिकेमध्ये करतात. वाहतूक आणि मोजणीची कामे तरुण करतात. दर आठवड्याला त्यांना मजुरी रोख स्वरूपात दिली जाते. अनेक कुटुंबांच्या दैनंदिन गरजा, मुलांचे शिक्षण, औषधोपचार, कर्जफेड आणि घरखर्च याच पैशांवर अवलंबून असतो. या संपूर्ण प्रक्रियेत महिलांचा मोठा सहभाग असतो. अनेक घरांमध्ये महिलाच घराचा आर्थिक कणा असतात. कडक उन्हात, काटेरी जंगलातून, डोक्यावर ओझे घेऊन त्या दिवसभर काम करतात. तरीही त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळी जिद्द दिसते. कारण त्यांना माहिती असते, आज जंगलात गेलो नाही, तर उद्या चूल पेटणार नाही. मात्र मनात भीतीही असते. गडचिरोली, चंद्रपूर आणि विदर्भातील जंगलांमध्ये तेंदूपत्ता संकलनासाठी जाणाऱ्या लोकांना दररोज वाघ, बिबट्या, अस्वल, साप आणि रानडुक्कर यांसारख्या वन्यप्राण्यांचा सामना करावा लागतो. अनेकदा हल्ल्यांच्या घटना घडतात. काही जखमी होतात, तर काहींना आपला जीवही गमवावा लागतो. दर वर्षी अशा दुर्घटनांच्या बातम्या समोर येतात. तरीही दुसऱ्या दिवशी पुन्हा लोक जंगलात जातात. कारण, पोटाची भूक ही भीतीपेक्षा मोठी असते. अनेक आदिवासी कुटुंबांसाठी तेंदूपत्ता म्हणजे धोका असला तरी जगण्याचा आधार आहे. पर्यायी रोजगार नाही, उद्योग नाहीत, स्थिर उत्पन्न नाही, उन्हाळ्यात कामाची दुसरी संधी नाही. त्यामुळे जंगल हेच त्यांच्यासाठी शेवटचे आशास्थान ठरते.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# दोन लाखांपर्यंतच्या कर्जमाफीवर शिक्कामोर्तब; विधान परिषद निवडणुकीनंतर होणार घोषणा

**मुंबई/वृत्तसंस्था**

मंत्रिमंडळ बैठकीत मंगळवारी शेतकरी कर्जमाफीला मान्यता देण्यात आली. आता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे दोन लाखांपर्यंतचे थकित कर्ज माफ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या कर्जमाफीची घोषणा सध्या सुरू असलेल्या विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीपूर्वीच जाहीर केले होते.

विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेले शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाळले आहे. फडणवीस यांनी यंदा अर्थमंत्री म्हणूनही अर्थसंकल्प मांडला. त्याचवेळी त्यांनी कर्जमाफीची घोषणा केली होती. अखेर या निर्णयाला मंगळवारी मंत्रिमंडळ



बैठकीत मान्यता मिळाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 30 सप्टेंबर 2025 पर्यंत पीककर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली होती. त्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना केली. त्यानुसार पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळेल. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देणार असल्याची घोषणाही फडणवीस यांनी केली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने 2 जून रोजी मान्यता दिलेल्या शेतकरी कर्जमाफीचा राज्यातल्या एकूण 56 लाख शेतकऱ्यांना फायदा होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांची तब्बल 36,585 कोटी रुपयांची कर्जमाफी होणार आहे. मात्र, या यामुळे सरकारच्या तिजोरीवर तब्बल 25 हजार कोटींचा भार पडण्याची शक्यता आहे. एकीकडे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अनुदान आणि आता दुसरीकडे शेतकरी कर्जमाफी या दोन्ही योजनांमुळे सरकारला आगामी काळात आर्थिक काटकसर करावी लागण्याची शक्यता आहे.

**मंत्रिमंडळ बैठकीतील महत्वाचे निर्णय...**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ मधील कामांसाठी आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेच्या 500 दशलक्ष अमेरिकन डॉलर्स कर्जास तसेच राज्य निधीच्या प्रस्तावास मान्यता.

रस्त्यांच्या सुधारणेसाठी आशियाई पायाभूत गुंतवणूक बँके व न्यू डेव्हलपमेंट बँकेकडून अर्थसहाय. महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पाला दोन्ही बँकाकडून मिळणार प्रत्येकी 8 हजार 700 कोटी रुपयांचे अर्थसहाय्य.

हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ, मुंबई या समूह विद्यापीठामध्ये सहा महाविद्यालयांचा समावेश करण्यास मंत्रिमंडळाची मान्यता.

## ‘व्हीआयपी’चा मोफत टोल प्रवास बंद !एनएचएआयची नविन योजना : व्हीआयपी संस्कृतीला आळा

**मुंबई/वृत्तसंस्था**

नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय) च्या टोल प्लाझावर सध्या विविध वाहनांना सूट मिळते. मात्र, केंद्र सरकार आता या सूट यादीत मोठा बदल करण्याच्या विचारात आहे. वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या वाहनांसह काही श्रेणींना दिली जाणारी टोल सूट रद्द करण्याची तयारी सुरू आहे. उच्चस्तरीय समितीच्या शिफारशींनुसार हे बदल केले जाणार असून, सूट कमी करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबवली जाईल. यामुळे टोल उत्पन्न वाढेल आणि व्हीआयपी संस्कृतीला आळा बसण्यास मदत होईल, असे मानले जात आहे.

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने उच्चस्तरीय समितीच्या शिफारशींवर चर्चा सुरू केली आहे. समितीने नॅशनल हायवे फी नियमांमध्ये बदल सुचवला आहे. यानुसार, सूट देण्याची सध्याची श्रेणी पूर्णपणे काढून टाकण्याची किंवा मोठ्या प्रमाणात कमी करण्याची शिफारस करण्यात आली आहे. एकदम मोठा बदल टाळण्यासाठी सूट टप्प्याटप्प्याने कमी केली जाईल. यामुळे टोल प्लाझावर मोफत जाणाऱ्या वाहनांची संख्या लक्षणीय घटेल. सरकारचा हा निर्णय व्हीआयपी संस्कृती कमी करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. अनेकदा सरकारी अधिकाऱ्यांच्या वाहनांमुळे सामान्य नागरिकांना त्रास होतो आणि टोल प्लाझावर वाद निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर सरकारने विविध विभाग आणि राज्य सरकारांना फास्टॅग वापरण्याचे आवाहन केले आहे.

सध्या केंद्र आणि राज्य सरकारातील 25 उच्च पदाधिकाऱ्यांच्या



वाहनांना आणि त्यांच्या सोबतच्या वाहनांना टोल सूट मिळते. याशिवाय, युनिफॉर्मधील संरक्षण कर्मचारी, केंद्र आणि राज्य सशस्त्र दल, अर्धसैनिक दल, कार्यकारी दंडाधिकारी, अग्निशमन दल, महामार्ग तपासणी पथके, रुग्णवाहिका आणि अंत्ययात्रा वाहनांना सध्या सूट आहे. नव्या योजनेनुसार, सरकारी अधिकाऱ्यांच्या वाहनांना प्रथम सूट यादीतून वगळले जाणार आहे. यामुळे मोठ्या संख्येने वाहने टोल भरण्यास बांधील होतील. केवळ अत्यावश्यक सेवेतील वाहनांनाच सूट कायम ठेवण्याचा विचार आहे. यामुळे टोल उत्पन्नात वाढ होईल आणि रस्ते विकासासाठी अधिक निधी उपलब्ध होईल.

## भारतात राहणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी इमिग्रेशन नियम बदलले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने परदेशी नागरिकांच्या नोंदणी आणि अपीलशी संबंधित नियमांमध्ये बदल केले आहेत. गृह मंत्रालयाने इमिग्रेशन अँड फॉरेनर्स (सुधारणा) नियम, 2026 ची अधिसूचना जारी केली. नवीन नियमांनुसार, परदेशी नागरिक आता 180 दिवस पूर्ण होण्यापूर्वी कधीही नोंदणी करू शकतील. ऑनलाइन अपीलचा पर्यायही देण्यात आला आहे.

यापूर्वी, भारतात 180 दिवस पूर्ण झाल्यानंतर परदेशी नागरिकांना 14 दिवसांच्या आत नोंदणी करावी लागत होती. आता ते 180 दिवस पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही वेळी नोंदणी करू शकतील. सरकारने असेही म्हटले आहे की, निर्धारित वेळ निघून गेल्यानंतर नोंदणी केवळ विशेष परिस्थितीतच केली जाईल. पहिल्यांदाच ऑनलाइन अपीलची व्यवस्था जोडण्यात आली आहे. कोणत्याही आदेशामुळे प्रभावित झालेली व्यक्ती आता ब्युरो ऑफ इमिग्रेशनच्या आयुक्तांकडे ऑनलाइन अपील करू शकेल. आदेश मिळाल्यापासून 30




दिवसांच्या आत अपील करावे लागेल. आयुक्त संबंधित पक्षाची सुनावणी केल्यानंतर निर्णय देतील. 60 दिवसांच्या आत प्रकरणाचा निपटारा करण्याचा प्रयत्न करावा लागेल. भारतात राहणारे एखादे मूल दुसऱ्या देशाचे नागरिकत्व मिळवते, तर त्याच्या पालकांना 30 दिवसांच्या आत याची माहिती नोंदणी अधिकाऱ्याला द्यावी लागेल. याव्यतिरिक्त, काही प्रकरणांमध्ये माहिती देण्याची वेळ मर्यादा 24 तास निश्चित करण्यात आली आहे. गृह मंत्रालयाने हे बदल इमिग्रेशन अँड फॉरेनर्स ॲक्ट, 2025 च्या कलम 30 अंतर्गत केले आहेत. यासाठी इमिग्रेशन अँड फॉरेनर्स (सुधारणा) नियम, 2026 जारी करण्यात आले आहेत.

## 'लाडकी बहीण'चा लाभ घेणाऱ्या पुरुषांकडून पैसे वसूल करणार : फडणवीस यांचा इशारा

**मुंबई/वृत्तसंस्था**

लाडकी बहीण योजनेतील ज्या लाभार्थ्यांचे केवायसी पूर्ण झाले आहे, त्या महिलांचे पैसे सुरू राहतील. अनेकांनी केवायसी केले नाही. याचा अर्थ ते निकष पूर्ण करत नाहीत. तरीही पुन्हा एकदा केवायसी विंडो सुरू करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अपात्र बहिणींकडून पैसे वसूल करणार नाही. मात्र, ज्या 14 हजार पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला, त्यांच्याकडून पैसे वसूल करणार करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेची पूर्तता न करणे, आवश्यक निकष पूर्ण न होणे आणि अर्जांमधील त्रुटींमुळे राज्यातील तब्बल 80 लाख महिला अपात्र ठरल्या असून, त्यांना दरमहा मिळणारी 1500 रुपयांची आर्थिक मदत आता बंद झाली आहे. इतक्या मोठ्या संख्येने लाभार्थी महिलांना योजनेतून वगळण्यात आल्याने विरोधकांनी सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले असून, या वाढत्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संपूर्ण प्रकरणावर आपली पहिली प्रतिक्रिया नोंदवली आहे.

**पात्र बहिणीला वगळले नाही**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील कुठल्याही पात्र लाडक्या बहिणीला योजनेतून वगळलेले नाही. डेटाबेसनुसार आणि निकषात न बसणाऱ्या ज्या लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, तसेच ज्या लाडक्या बहिणी योजनेच्या निकषात बसत नाही आणि ज्यांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही त्या 80 लाख लाडक्या बहिणींना यामध्ये वगळण्यात आले आहे.





# दिल्लीत हॉटेलला आग ; 21 जणांचा मृत्यू

## मृतकांमध्ये बांगलादेश-आफ्रिकन देशांचे १७ नागरिक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

दिल्लीच्या मालवीय नगर भागातील 'फ्लोरीश स्टे हॉटेल'मध्ये बुधवारी लागलेल्या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये १७ परदेशी नागरिकांचा समावेश असून, ते बांगलादेश आणि विविध आफ्रिकन देशांतील रहिवासी होते. दिल्ली अग्निशमन दल आणि स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, मालवीय नगर येथील या हॉटेलमध्ये असलेल्या उपहारगृहात सकाळी ८:५० वाजता आगीचा भडका उडाला. त्यानंतर ही आग इमारतीच्या वरच्या मजल्यांवरील खोल्यांमध्ये तसेच तळघरातही वेगाने पसरली.

मुख्य अग्निशमन अधिकारी अभिलाष मलिक यांनी सांगितले की, अग्निशमन दलाच्या पथकाने इमारतीमधून ३७ लोकांना सुखरूप बाहेर काढले. या इमारतीकडे 'फायर एनओसी' उपलब्ध नव्हते. या हॉटेलमध्ये एकूण २५ खोल्या आहेत. या दुर्घटनेवर प्रतिक्रिया देताना भाजप आमदार सतीश उपाध्याय यांनी सांगितले की, सकाळी सुमारे 9 वाजता ही घटना घडली. माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व यंत्रणा सक्रिय



करण्यात आल्या. स्थानिक नागरिकांनीही बचावकार्यात मोठे सहकार्य केले. दिल्ली पोलिस, अग्निशमन दल आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरू केले.

एसडीएम जितेंद्र कुमार यांनी सांगितले की, कॉल मिळताच डीडीएमए यंत्रणा सक्रिय करण्यात आली. संबंधित इमारतीच्या तळमजल्यावर रेस्टॉरंट सुरू होते. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून त्याचा सखोल तपास सुरू आहे.

या भीषण दुर्घटनेमुळे दिल्लीत हळहळ व्यक्त होत असून मृतांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. प्रशासनाने या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे. दिल्लीतील आगीच्या दुर्घटनेसाठी जबाबदारी निश्चित करण्याच्या उद्देशाने, दंडाधिकारीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी या आगीच्या घटनेबाबत सविस्तर अहवाल मागवला आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या चौकशीत कोणत्याही प्रकारची कसूर आढळल्यास, कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

**अग्निसुरक्षा उपाययोजनांचा अभाव असलेल्या वास्तू सीलबंद करण्याचे आदेश**

अग्निसुरक्षा नियमांचे पालन करण्यात कसूर करणाऱ्या आस्थापनांवर सीलबंद करण्याची कारवाई करण्याचे आदेश दिल्लीच्या नायब राज्यपालांनी दिले आहेत. संबंधित ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या एका उच्चस्तरीय बैठकीदरम्यान त्यांनी अधिकाऱ्यांना हे निर्देश दिले. बैठकीनंतर अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. हॉटेल्स, नर्सिंग होम्स आणि कोचिंग सेंटर्सची तपासणी करण्यासाठी एक विशेष मोहीम राबवली जाणार आहे.

# दोन विवाह मोडले, प्रेमसंबंधानंतर लिव्ह इन रिलेशन, पुण्यातील प्रीतीची भीती, तरुणाने भलतंच केलं

**पुणे/वृत्तसंस्था**

'लिव्ह-इन रिलेशनशिप'मध्ये राहणाऱ्या तरुणाला अत्याचाराच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देऊन वारंवार पैशांची मागणी करण्यात आली. या मानसिक छळाला कंटाळून तरुणाने गळफास घेऊन आयुष्याची अखेर केल्याची धक्कादायक घटना खराडी परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी एका महिलेसह चौघांना अटक केली असून, त्यांच्याविरुद्ध जीव देण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.करण बाळासाहेब कांबळे (वय २८, मूळ रा. खरबा, ता. मानवत, जि. परभणी) असे आयुष्याची अखेर केलेल्या तरुणाचे नाव आहे. प्रीती अनिकेत बोंढर्डे ऊर्फ रमिसा ऊर्फ माही ऊर्फ प्रीती सुधीर रणदिवे (वय ३१, रा. थिटे वस्ती, खराडी), अनिकेत बोंढर्डे (वय ४१, रा. जेधेनगर,




बिबवेवाडी), संस्कृती सुधीर रणदिवे (वय २५) आणि ऋत्विक सुधीर रणदिवे (वय २६, दोघे रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत करणचा भाऊ कृष्णा कांबळे (वय ३४) यांनी खराडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. करण आणि प्रीती यांची काही काळापूर्वी ओळख झाली होती. ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले आणि दोघेही खराडीतील थिटे वस्ती परिसरात एकत्र राहत होते. प्रीतीचे यापूर्वी दोन विवाह झाले होते. वैवाहिक आयुष्यात मतभेद झाल्यानंतर ती वेगळी राहत असल्याचे तपासात समोर आले आहे.सततच्या त्रासामुळे आणि धमक्यांमुळे नैराश्यात गेलेल्या करणने सोमवारी (एक जून) खराडीतील राहत्या घरात गळफास घेऊन जीव दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर त्याच्या भावाने पोलिसांकडे धाव घेतल्यावर संपूर्ण प्रकार उघडकीस आला.तक्रारीची पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी चौघांविरुद्ध जीव देण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक चंद्रसेन पालकर तपास करीत आहेत.प्रीतीचा पहिला पती अनिकेत बोढर्डे; तसेच तिचा भाऊ आणि बहीण यांनी करणवर दबाव टाकण्यास सुरुवात केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्याच्याकडे वारंवार पैशांची मागणी केली जात होती. पैसे न दिल्यास अत्याचाराचा गुन्हा दाखल करून अडचणीत आणण्याची धमकी दिली जात होती.

# पुण्यात प्रियकर तरुणीला संपवलं, बॉडी तशीच ठेवून कुलूप लावलं अन् तरुणाने गाव गाठलं

**पुणे/वृत्तसंस्था**

'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये राहणाऱ्या तरुणाने जोडीदार तरुणीच्या चारित्र्यावर संशय घेऊन गळा आवळून खून केला. ही घटना वाघोली परिसरात घडली. तरुणीचा मृतदेह घरातच ठेवून बाहेरून कुलूप लावून आरोपी मूळ गावाकडे पसार झाला होता. घरातून दुर्गंध येत असल्याने पोलिसांनी कुलूप तोडले असता, तरुणीचा अर्धवट कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला. रवी सुरेश वैराळ (वय २७, रा. आव्हाळवाडी रस्ता, वाघोली, मूळ रा. वरघडी वैराळ, ता. मेहकर, जि. बुलढाणा) असे अटक आरोपीचे नाव आहे. रिहाना खातून (वय २६, मूळ रा. नोंदईगाजन, मेदिनापूर, पश्चिम बंगाल) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे. तिच्या बहिणीचे पती इमरान राजेसाहेब बोदलेखान (वय ३१, रा. आदर्शनगर, लोहगाव) यांनी वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना २८ ते ३१ मे दरम्यान वाघोलीतील आव्हाळवाडी रस्ता परिसरातील एका इमारतीतील सदनिकेत घडली.तक्रारदार बांधकाम मजुरी करतात. त्यांची मेहुणी रिहाना आणि आरोपी रवी दोन वर्षांपासून वाघोलीतील केसनंद रस्त्यावरील एका इमारतीत 'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये राहत होते. रवी वैराळ हा प्लंबर म्हणून काम करतो. तो आणि रिहाना भाडेतत्त्वावर राहत होते. या दोघांमध्ये २८ मे रोजी कडाक्याचे भांडण झाले. त्यानंतर ही घटना घडली. पोलिसांच्या चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली.

आरोपी रवी वैराळला मंगळवारी दुपारी न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपीने कशाच्या साह्याने तरुणीचा खून केला, त्याला गुन्हा करण्यासाठी आणखी कोणी मदत केली, याबाबत तपास करण्यासाठी त्याला पोलिस कोठडी देण्याची मागणी केली.

# मुंबईत कॅबचालक तरुणीचं कांड उघड; पोलिसांची गुजरातमध्ये कारवाई...

**मुंबई/वृत्तसंस्था**

आग्रीपाडा येथील एका फ्लॅटमधील नशेची प्रयोगशाळा उघडकीस आल्याचे प्रकरण ताजे असतानाच, साकीनाका पोलिसांनी आता गुजरातमधील एका घरात सुरू असलेला ड्रग्जचा कारखाना उद्ध्वस्त केला आहे. भाड्याने घर घेऊन एमडी ड्रग्ज तयार करून त्याची विक्री मुंबईत केली जात होती. पोलिसांनी या प्रकरणात एका महिलेसह दोघांना अटक केली असून, गुजरातमधील घरातून द्रवस्वरूपातील एमडी आणि ड्रग्ज बनवण्याचे साहित्य असा सुमारे ७४ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.साकीनाका पोलिसांनी २१ मे रोजी अंधेरी घाटकोपर-लिंक रोडवर ड्रग्जविक्रीसाठी आलेल्या मुस्कान खान (२६) या महिलेला ताब्यात घेतले. तिच्याकडे १०१ ग्रॅम एमडी सापडल्याने गुन्हा दाखल करून तिला अटक केली. मुस्कानने हे ड्रग्ज



मुंब्रा येथील वझुल चौधरी ऊर्फ पप्पू (५६) याच्याकडून घेतल्याचे सांगितले. पोलिसांनी वझुल याला शिळफाटा येथून ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीमध्ये धक्कादायक माहिती समोर आली. वझुलने तो स्वतःच एमडी ड्रग्ज बनवत असल्याचे सांगितले.गुजरातच्या नर्मदा जिल्ह्यातील वरखड येथे ओळखीच्या व्यक्तीचे घर भाड्याने घेऊन त्यामध्ये एमडीची निर्मिती करीत असल्याची माहिती त्याने दिली. साकीनाका पोलिसांनी गुजरातमधील या घरामध्ये छापा टाकला. या घरामध्ये एमडी ड्रग्ज तयार करण्यासाठी एक युनिट उभारण्यात आले होते. पोलिसांनी वेगवेगळी केमिकल, द्रव स्वरूपातील एमडी ड्रग्ज, इतर साहित्य असा सुमारे ७४ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

मुस्कान ही कॅब चालवत असल्याचे पोलिस तपासात समोर आले. कोणालाही संशय येऊ नये यासाठी मुस्कान कॅब चालवण्याच्या बहाण्याने ड्रग्जविक्री करीत होती. या आडून रॅकेटमध्ये आणखी किती जणांचा समावेश आहे, याबाबत चौकशी केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.मिरा-भाईंदरमध्ये अमली पदार्थ विक्रीसाठी बाळगणाऱ्या दोघांना अटक केल्यानंतर पोलिसांनी तेलंगणातील एका फार्महाऊसमध्ये सुरू असलेल्या अमली पदार्थ निर्मितीच्या कारखान्यावर छापा टाकला. मिरा-भाईंदर गुन्हे शाखा ४च्या पथकाने केलेल्या या कारवाईत २० कोटी रुपयांहून अधिक किमतीचे एमडी तयार करण्याचे साहित्य जप्त केले. मिरा रोडच्या नयानगर भागातील एक घरावर मागील महिन्यात गुन्हे शाखेने छापा टाकून अडीच कोटींहून अधिक किंमतीचा एमडी हा अमली पदार्थ जप्त केला होता. एमडी बाळगणाऱ्या फिरदोस आणि अरबाज या जोडप्याला अटक करण्यात आली होती. त्यांच्या चौकशी आणखी काही जणांचा सहभाग आढळल्याने १५ जणांना अटक करण्यात आली होती. यापूर्वी मुंबईतील मालवणीसह अन्य भागांतून एमडी तयार करण्यासाठी लागणारे सुमारे १३ कोटी रुपये किमतीचे साहित्य जप्त करण्यात आले होते. तपासादरम्यान एमडी निर्मितीच्या रॅकेटमध्ये आणखी काही जण सक्रिय असल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी खालापूर येथून संदीप नायडू, बाबा शेख आणि मेहमूद खान यांना अटक केली. त्यांच्या चौकशीत तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील पिचारगंडी गावात अमली पदार्थ निर्मितीचा कारखाना सुरू असल्याची माहिती उघड झाली.

# सूर्यकुमार यादवला आधी कर्णधार पदावरून हटवत आता संघातूनही डावललं?




■ मुंबई/वृत्तसंस्था

भारताला तिसरा टी-२० वर्ल्ड कप जिंकून देणाऱ्या सूर्यकुमार यादवबाबत मोठी बातमी समोर आली आहे. सूर्यचे भारतीय संघाचे कर्णधारपद काढून घेण्यात आले आहे. त्यासोबतच त्याला संघातही स्थान देण्यात आलेले नाही. मीडिया रिपोर्टनुसार सूर्याला संघातून बाहेर करण्यात आलं असून टीम मॅनेजमेंट नवीन कर्णधाराकडे नेतृत्त्व सोपवणार आहे. आता कर्णधारपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

सूर्यकुमार यादव याच्या खराब फॉर्मने ही वेळ त्याच्यावर आली असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. कारण सूर्याच्या नेतृत्वात भारताने वर्ल्ड कप जिंकला होता. पण त्याने बॅटने मात्र निराशाच केलेली. आता झालेल्या आयपीएल २०२६ मध्येही सूर्याचा खराब फॉर्म कायम राहिला. संघ जिंकत होता मात्र सूर्याचा फॉर्म हा विषय काम चर्चेत होता. वर्ल्ड कप वेळी कोच गौतम गंभीरने सूर्यचे समर्थन करत निकाल तर आपल्या बाजूने येत आहेत ना असं म्हटले होते. मात्र आता आगामी वर्ल्ड कप २०२८ ला नवीन कर्णधार असावा याहष्टीने बीसीसीआय विचार करत असल्याचं दिसत आहे.निवड समिती, बोर्ड आणि टीम मॅनेजमेंने कोच गौतम गंभीरसोबत चर्चा करून हा निर्णय घेतला आहे. सूर्यनि वर्ल्ड कप जिंकला असला तरी त्याचा आताचा फॉर्म आणि पुढील प्लॅनिंग पाहता नवीन कर्णधाराकडे जाण्याची वेळी आली आहे, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिल्याचं समजत आहे.सूर्यकुमार यादव याने २०२१ मध्ये डेब्यू केल्यानंतर सूर्यानं जवळपास ३ वर्षे तुफान फॉर्म दाखवला होता. कारण २०२२ आणि २०२३ ला आयसीसीचा टी-२० प्लेयर ऑफ द अवॉर्ड त्याने जिंकला होता. आयसीसी रँकिंगमध्ये तो जगातील नंबर एकचा फलंदाज होता. त्यावेळी सूर्याचा तो सुवर्णकाळ सुरू होता. रोहितने निवृत्ती घेतल्यावर सूर्याकडे नेतृत्वाची जबाबदारी सोपवली गेली. हार्दिक पंड्याचे नाव चर्चेत असताना सूर्यनि बाजी मारली होती. आशिया कप २०२५ सूर्यनि जिंकला होता, त्यानंतर वर्ल्ड कप २०२६ च्या ट्रॉफीवर नाव कोरले होते. मात्र सूर्याच्या फॉर्ममध्ये तो दरारा न राहिल्याने भविष्याचा विचार करत हा निर्णय घेतला गेल्याचं दिसत आहे.भारतीय संघाच्या कर्णधारपदी कोणाची वर्णी लागणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. गेल्या काही दिवसांपासून श्रेयस अय्यर, इशान किशन, संजू सॅमसन यांची नावे चर्चेत आहेत. आगामी आयर्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघ नवीन संघासोबत मैदानात उतरताना दिसेल.

## सिराज दुखापतीमुळे कसोटी सामना मुकण्याची शक्यता

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामन्यात वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजचा सहभाग होण्याची शक्यता कमी आहे. तो पूर्णपणे तंदुरुस्त नाही. आयपीएल 2026 च्या अंतिम सामन्यादरम्यान त्याला त्रास झाला होता आणि त्याला फिजिओथेरपीची गरज लागली होती. जर तो न्यू चंदीगड येथील कसोटी सामन्यातून बाहेर पडला, तर भारतीय संघाला संघात एका नवीन वेगवान गोलंदाजाचा समावेश करावा लागेल. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामना 6 जूनपासून सुरू होणार आहे.वृत्तानुसार, सिराजच्या सहभागाबाबतचा निर्णय पुढील 48 तासांत घेतला जाऊ शकतो. वैद्यकीय पथक या वेगवान गोलंदाजावर लक्ष ठेवून आहे आणि त्याच्यावरील कामाचा ताण कसा सांभाळायचा याचे मूल्यांकन करत आहे. जर तो बाहेर पडला, तर भारतीय संघात पदार्पण करणाऱ्या गुरनूर ब्रारला प्रसिद्ध कृष्णासोबत नवीन चेंडूने गोलंदाजी करण्याची संधी दिली जाऊ शकते. भारताने या कसोटीसाठी केवळ तीन वेगवान गोलंदाजांची निवड केली आहे. दरम्यान, जम्मू आणि काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीचाही संघात समावेश केला आहे. तो सध्या संघासोबत असून त्याला नेट गोलंदाज म्हणून बोलावण्यात आले आहे. गुर्जपनीत सिंग आणि प्रिन्स यादव यांच्यासारखे वेगवान गोलंदाजही टीम इंडियासोबत नेट गोलंदाज म्हणून आहेत. सिराज आयपीएल 2026 च्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या गुजरात टायटन्स संघाचा भाग होता. तो सर्व 17 सामने



खेळला आणि 29.57 च्या सरासरीने व 9.06 च्या इकॉनॉमीने 19 बळी घेतले. तो कागिसो रबाडा नंतर गुजरातचा दुसरा सर्वात यशस्वी गोलंदाज होता. सिराज भारताच्या कसोटी संघातील एक महत्त्वाचा खेळाडू आहे. गेल्या वर्षीच्या इंग्लंड दौऱ्यात, जेव्हा पाच सामन्यांची मालिका 2-2 अशी बरोबरीत संपली, तेव्हा तो सर्व पाच कसोटी सामने खेळला आणि धैर्याने गोलंदाजी केली. त्याने अंतिम कसोटीत शेवटचा बळी घेऊन भारताला एक संस्मरणीय विजय मिळवून दिला. भारत आता श्रीलंकेत कसोटी मालिका खेळणार आहे. त्यानंतर ते न्यूझीलंडला जाऊन तेथे दोन कसोटी सामने खेळतील. सिराजच्या बाबतीत वैद्यकीय पथक काय निर्णय घेते हे पाहणे बाकी आहे.

6 ते 10 जून एकमेव कसोटी सामना खेळवला जाईल. या सामन्यासाठी जेव्हा संघ जाहीर झाला तेव्हा सगळ्यांच्या भुवया उंचावल्या होत्या कारण संघात गुरनूर ब्रारला स्थान मिळाले होते. आता त्याला पदार्पणाची संधी मिळाली तर तो विशेष काय करतो याकडे सर्वांचे लक्ष असेल.

## BCCIकडून न्यूझीलंड दौऱ्याची घोषणा

■ मुंबई/वृत्तसंस्था




भारतीय क्रिकेट संघ न्यूझीलंडचा दौरा करणार असून याची अधिकृत घोषणा बीसीसीआयकडून करण्यात आली आहे. वन डे, टी-२० आणि कसोटी मालिका होणार आहे. नियमित कर्णधार शुभमन गिल वन डे आणि कसोटी तर टी-२० मध्ये सूर्यकुमार यादव असू शकतो. या दौऱ्यामध्ये पाच टी-२०, पाच वन डे आणि दोन कसोटी सामने होणार आहेत. या मालिकेचे सामने नेमके कधी असणार आहेत? कुठे पाहायला मिळू शकतात जाणून घ्या.भारत आणि न्यझीलंडमधील दौऱ्यातील पहिला सामना २२ ऑक्टोबरपासून सुरू असून २७ नोव्हेंबरपर्यंत असणार आहे. क्राइस्टचर्च, वेलिंगटन, माउंट माउंगानुई, हैमिल्टन और ऑकलैंड या ठिकाणी पाच टी-२० सामने होणार असून नोव्हेंबरला वन डे मालिकेला सुरूवात होणार आहे. तर १९ नोव्हेंबरला पहिला कसोटी सामना असणार आहे.भारत आणि न्यूझीलंडविरूद्धमधील हे सामने कुठे पाहता येणार याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. लवकरच बोर्डाकडून याबाबत माहिती दिली जाईल. भारतीय क्रिकेट संघ जवळपास ७ वर्षांनी न्यूझीलंडमध्ये कसोटी मालिका खेळण्यासाठी उतरेल. भारतीय क्रिकेट संघ २०१९ मध्ये किवींच्या देशात खेळले होते. २०२२ मध्ये व्हाईट बॉल क्रिकेटच्या मालिकेसाठी गेले होते. ही मालिका दोन्ही संघांसाठी महत्त्वाची मानली जात आहे.

# असं कसं चालेल! RCBने जिंकली सलग दुसरी ट्रॉफी, पण विजयाचा पडद्यामागचा हिरो दुर्लक्षितच, कौतुक झालंच पाहिजे

■ अहमदाबाद/वृत्तसंस्था



रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाला सलग दुसरे आयपीएल विजेतेपद मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या विराट कोहली, रजत पाटीदार आणि भुवनेश्वरकुमार यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. मात्र, या यशात एक व्यक्तीचाही मोठा वाटा आहे. ती म्हणजे संघाचे मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर. बेंगळुरू'ला जेतेपदाच्या शोधात असणाऱ्या संघावरून 'इतिहास घडवणारा संघ' बनवणारे पडद्यामागची शांत; पण तितकीच महत्त्वाची व्यक्ती म्हणून त्यांचा गौरव होत आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये फ्लॉवर यांनी 'बेंगळुरू'ची सूत्रे हाती घेतली, तोपर्यंत 'बेंगळुरू' च्या खात्यात एकही जेतेपद नव्हते. तेव्हा 'बेंगळुरू'ला फुटबॉल लीगमधील पॅरिस सेंट जर्मेन संघ म्हणून 'ट्रोल' केले जात होते. मोठे खेळाडू संघात असूनही 'बेंगळुरू' जेतेपदापर्यंत पोहोचत नव्हता. मात्र, झिम्बाब्वेचे फ्लॉवर 'बेंगळुरू' साठी तारणहारच ठरले.फ्लॉवर यांनी २००५ मध्ये इंग्लंडला ॲशेस मालिका, २०१२ मध्ये भारतात कसोटी मालिका आणि २०१० मध्ये टी-२० वर्ल्ड कप जिंकून दिला होता. क्लब पातळीवर त्यांनी विविध संघांना विजेतेपद मिळवून दिले होते. माईक हेसन यांच्याकडून सूत्रे हाती घेतल्यानंतर, फ्लॉवर यांचे मुख्य लक्ष्य 'बेंगळुरू'ची गोलंदाजी मजबूत करण्यावर होते. तरुण प्रतिभेला नेहमीच पाठिंबा देणाऱ्या फ्लॉवर यांनी मार्गदर्शक दिनेश कार्तिक, क्रिकेट संचालक मो बोबाट आणि सहायक संघासोबत मिळून रसिक सलाम, सुयश शर्मा, अभिनंदन सिंग आणि मंगेश यादव यांसारख्या काही युवा गोलंदाजांना संघात आणले. कर्णधार म्हणून रजत पाटीदार यशस्वी ठरला. विराट कोहलीसह अनुभवी खेळाडूंशी त्यांनी उत्तम समन्वय राखला. खेळाडूंच्या प्रतिभेला, त्यांच्या नैसर्गिक खेळाला प्रोत्साहन दिले. एक चांगली भट्टी जमवली. त्यामुळे सलग दुसरे जेतेपद 'बेंगळुरू'ला मिळवता आले.दोन्ही बाजूंनी चेंडू स्विंग करण्यात भुवनेश्वरकुमार तरबेज आहे. ३६ वर्षीय भुवीने पुन्हा एकदा 'टी-२० मध्ये आपली जादू कायम असल्याचे दाखवून दिले. पर्पल कॅपच्या शर्यतीत शेवटपर्यंत आघाडीवर असलेल्या भुवीने १६ सामन्यांत २८ विकेट २३ अशी त्याची सर्वोत्तम कामगिरी २०११ पासून भुवी आयपीएलमध्ये घेतल्या. ४ बाद ठरली. खेळतोय. आयपीएलमध्ये सर्वाधिक विकेट घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत भुवी २२६ विकेटसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. युझवेंद्र चहल (२३३) अव्वल आहे.

# जॅकलिनच्या अडचणीत वाढ; मनी लाँडरिंग प्रकरणात न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश

मनी लाँडरिंग प्रकरणात जॅकलिन फर्नांडिसच्या अडचणी वाढल्या आहेत. २०० कोटी रुपयांच्या कथित खंडणी संबंधित दिल्लीच्या पटियाला हाऊस न्यायालयाने आरोप निश्चित करण्यासाठी पुरेसे पुरावे उपलब्ध असल्याचा निकाल दिला आहे. पटियाला हाऊस कोर्टाने या प्रकरणात सुकेश चंद्रशेखर, लीना मारिया पॉल, बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस आणि इतर आरोपींवर आरोप निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.

या प्रकरणाशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात आरोप निश्चित करण्यासोबतच, २०० कोटी रुपयांच्या कथित खंडणीशी संबंधित मकोका प्रकरणातही न्यायालयाने सुकेश चंद्रशेखर, लीना मारिया पॉल आणि इतर आरोपींवर आरोप निश्चित केले आहेत. न्यायालयाने सर्व आरोपींना आरोपांवर औपचारिक स्वाक्षरी करण्यासाठी ३ जून रोजी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

हे प्रकरण तक्रारदार अदिती सिंग यांच्या तक्रारीच्या आधारे दिल्ली पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरमधून उद्भवले आहे. तपास यंत्रणांनुसार, कथित फसवणूक करणारा सुकेश चंद्रशेखर तुरुंगातून कोट्यवधी रुपयांची खंडणी उकळल्याचा आणि त्या पैशांचा विविध मार्गांनी वापर केल्याचा आरोप आहे. अंमलबारी संचालनालयाचा आरोप आहे की, जॅकलिन फर्नांडिसला सुकेश चंद्रशेखरकडून महागड्या भेटवस्तू आणि इतर फायदे मिळाले, तर दुसरीकडे या अभिनेत्रीने सातत्याने हेच सांगितले आहे की, तिला या कथित गुन्हेगारी उत्पन्नाच्या स्रोताबद्दल काहीही माहिती नव्हती.

सुकेश चंद्रशेखर तुरुंगात असला तरी, त्याच्या व्यभिचाराची कहाणी सोशल मीडियावर चर्चेत आहे. जॅकलिनने एकदा या कुख्यात ठगाला भेट दिली होती आणि त्यानंतर त्यांच्या कथित प्रेमकथेचे पदर उलगडू लागले. सुकेशने जॅकलिनला महागड्या भेटवस्तू दिल्या आणि तिच्या परदेशातील कुटुंबीयांना मौल्यवान वस्तू भेट दिल्याचे वृत्त आहे. यातील बहुतेक पैसा बेकायदेशीरपणे कमावलेला होता आणि या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या प्रकरणात जॅकलिनला आता ३ जून रोजी न्यायालयात हजर राहावे लागेल.





# नाहीतर ते सगळं सपशेल फसलं असतं', 'मैं वापस आऊंगा'बद्दल स्पष्टच बोलली शर्वरी वाघ

सात वर्षांपूर्वी आलेल्या ' द फरगॉटन आर्मी ' या सीरिजमधील एका चेहऱ्यानं मनोरंजनसृष्टीचं लक्ष वेधलं, ती होती अभिनेत्री शर्वरी वाघ . पुढे 'बंटी और बबली २' या सिनेमात ती दिसली. नंतर आलेल्या 'मुंज्या' मध्ये तिनं कमालच केली. आता या गोड चेहऱ्याकडे संपूर्ण सिनेसृष्टीचं लक्ष लागलं आहे. आगामी अनेक बिग बजेट सिनेमांमध्ये तिची वर्णी लागली आहे. लवकरच 'मैं वापस आऊंगा' या पीरिऑडीक सिनेमामध्ये ती अनोख्या भूमिकेत दिसणार आहे.सिनेमात प्रेमकथा दाखवण्यात आली आहे, त्यात संवाद कमी आहेत. दोघं नजरेतून आणि हावभावातून संवाद साधतात, हे कसब शिकताना मजा आली. त्या कालखंडातील प्रेम करण्याची आणि ते व्यक्त करण्याची पद्धत जाणून घेताना आधी ती समजून घेणं आवश्यक होतं, नाहीतर ते सगळं सपशेल फसलं असतं, ते विनोदाकडे झुकलं असतं. असं होऊ नये यासाठी प्रयत्न केले. विशेष म्हणजे ते प्रयत्न नैसर्गिकरीत्या होणं अपेक्षित होतं, ते आमच्याकडून करून घेण्याचं काम दिग्दर्शक इम्तियाज अली यांनी केलं आहे.

'मुंजा' सिनेमा सुपरहिट झाल्यानंतर प्रेक्षकांचा आपलेपणा माझ्यापर्यंत पोहोचला. यामुळे आणखी चांगलं काम करण्याची ऊर्जा मिळाली, पण त्याचबरोबर त्यांच्या माझ्याकडून असलेल्या अपेक्षांचाही अंदाज आला. अजून जास्त चांगलं काम करण्यासाठी प्रयत्नशील आहे. अधिक चांगल्या संहिता कशा निवडायच्या, प्रेम करणाऱ्या प्रेक्षकांना भावतील अशा व्यक्तिरेखा कशा साकारायच्या आणि दमदार काम करून प्रेक्षकांचा माझ्यावर असलेला विश्वास कसा वाढवायचा, हे सगळं मला रसिक मायबाप नकळतपणे शिकवत आहेत. अर्थात, त्या अपेक्षांचं मी दडपण घेत नाही. नाहीतर दबावाचा कामावर नकारात्मक परिणाम होतो, हे मी जाणून आहे.मी ऑडिशन्स देत होते तेव्हाही स्पर्धा होती आणि आता माझे सिनेमे गाजल्यानंतरही स्पर्धा आहेच. ही स्पर्धा किंवा टिकून राहण्याची शर्यत नेहमीच -जीवघेणी किंवा नकारात्मक असू शकत नाही. ती स्पर्धा माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. माझ्या फळीतले इतर कलाकार चांगलं काम करतात तेव्हा त्यातूनही प्रेरणा मिळते. त्यामुळे अधिक चांगलं काम करण्याची ऊर्जा मिळते आणि आपसूक माझंही काम प्रभावी होतं. आज अनेक माध्यमातून उत्तम दर्जाचे कलाकार मिळत आहेत, प्रत्येक कलाकार आपल्या कामाचं नाणं खणखणीत वाजवत आहेत. त्याप्रमाणे मीदेखील माझं काम करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रत्येक भूमिकेतून प्रेक्षकांना नवं काहीतरी देण्याचा मी कसोशीनं प्रयत्न करत असते. आता माझ्या करिअरच्या सुरुवातीला मी प्रयोग करणंच अपेक्षित आहे. त्याशिवाय, सर्व्हायव्हलचा प्रश्न असतो. बाकी दिग्दर्शक-निर्मात्यांनाही कळलं पाहिजे की, मी विविध प्रकारच्या भूमिका साकारू शकते. म्हणून मी स्वतःला एखाद्या चौकटीत बसवण्याचा अजिबात प्रयत्न करत नाहीय. मी माझ्या लूकमध्ये, सिनेमांमध्ये, भूमिकांमध्ये, गाण्याच्या अल्बममध्ये, भाषेमध्ये विविधता आणण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्यासारखं इतर सगळ्या कलाकारांना मनाजोगतं काम करण्याची संधी मिळो !



# खतरों के खिलाडी परत येण्यास सज्ज; निर्मात्यांकडून प्रोमो शेअर

लोकप्रिय रिॲलिटी शो खतरों के खिलाडी परत येण्यास सज्ज झाला आहे. शूटिंग सुरू करण्यासाठी संपूर्ण टीम सेटवर दाखल झाली आहे. यामुळे खतरों के खिलाडीच्या चाहत्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. कलाकार सतत खतरों के खिलाडीच्या सेटवरून नवीन फुटेज शेअर करत आहेत. दरम्यान, खतरों के खिलाडीच्या निर्मात्यांनी चाहत्यांना एक अद्भुत भेट दिली आहे. नुकतेच, खतरों के खिलाडीच्या निर्मात्यांनी एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये खतरों के खिलाडीचा होस्ट रोहित शेट्टी धुमाकूळ घालताना दिसत आहे.

प्रोमोमध्ये रोहित शेट्टी कार चालवताना दिसत आहे. याच कारचा वापर करून खतरों के खिलाडी १५ चा होस्ट एका विमानाचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करत आहे. रोहित शेट्टीची स्टाईल पाहून सर्वजण थक्क झाले. लोक म्हणत आहेत की रोहित शेट्टी यावेळी खतरों के खिलाडी १५ मध्ये गोष्टी आणखी बिकट करणार आहे. रोहित शेट्टीने प्रोमोमध्ये याचे संकेतही दिले आहेत. त्याने म्हटले आहे की, यावेळी शोमधील भीतीचे वातावरण दुप्पट होणार आहे. त्यामुळे 'खतरों के खिलाडी १५' च्या कलाकारांना सावध राहावे लागेल.




जर या कलाकारांनी 'खतरों के खिलाडी १५' मध्ये कोणतीही चूक केली, तर रोहित शेट्टी त्यांच्यासाठी परिस्थिती आणखी बिकट करेल. यामुळेच चाहते आता 'खतरों के खिलाडी १५' बद्दल उत्सुक आहेत.

हर्ष गुजराल, शगुन शर्मा, रुबिना दिलैक, गौरव खन्ना आणि फरहाना भट्ट यांसारखे कलाकार 'खतरों के खिलाडी १५' मध्ये दिसणार आहेत. अविनाश मिश्रा, ऊरी, करण वाही, ऋत्विक धनजानी, जस्मिन भसीन, विशाल आदित्य सिंग आणि अविका गोर हे देखील या कलाकारांना कडवी टक्कर देण्यासाठी सज्ज आहेत. रुबिना दिलैक, गौरव खन्ना आणि फरहाना भट्ट सोशल मीडियावर सेटवरून चाहत्यांना सतत अपडेट्स देत असतात.

# मेहनत एकाची लाभ दुसऱ्यालाच! जब वी मेट सिनेमामुळे बॉबी देओलची खूप मोठी झालेली फसवणूक, इतकी वर्ष मनात सल कायम

गेले काही वर्ष बॉबी देओल सिनेपडद्यावर झपाट्याने काम करताना पाहायला मिळत आहे. त्याच्या प्रत्येक भूमिकांना प्रेक्षकांकडूनही उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळते. येत्या 202627 वर्षातही त्याचे बरेच सिनेमे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.सध्या बॉबी देओलकडे चित्रपटांची मोठी रांग लागलेली असली, तरी एक काळ असा होता जेव्हा त्याची मार्केट व्हॅल्यू कमी झाल्यामुळे त्याला अनेक प्रोजेक्टमधून वगळण्यात आले होते. जब वी मेट या चित्रपटाच्या बाबतीतही बॉबी देओलसोबत काहीसे असेच घडले होते. इम्तियाज अली दिग्दर्शित या चित्रपटात शाहिद कपूर आणि करिना कपूर ही जोडी दिसली होती. त्याच्या कारकिर्दीतील हा सर्वात महत्वाचे वळण घेणारा सिनेमा ठरला. पण बॉबी देओलसाठी माठी ते एक दुःख होते. अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान, बॉबी देओलने खुलासा केला की, त्याची




मार्केट व्हॅल्यू कमी असल्यामुळेच त्याला या चित्रपटातून काढून टाकण्यात आले होते.इम्तियाज अली यांच्या 2009 मधील 'जब वी मेट' या चित्रपटात जेव्हा शाहिद कपूरला त्याची जागा दिली, तेव्हा आपल्याला किती मोठा धक्का बसला होता, किंबहुना, आपले मन किती दुखावले गेले होते याची आठवण बॉबी देओलने नुकतीच सांगितली. विशेष म्हणजे, या चित्रपटासाठी दिग्दर्शक आणि मुख्य अभिनेत्री करीना कपूर या दोघांनाही सर्वप्रथम त्यानेच तयार केले होते.

एवढे करुनही, 'जब वी मेट'मधून बाहेर पडावे लागल्यामुळे आपल्याला झालेल्या वेदनांबद्दल बॉबी देओलने आता मनमोकळेपणाने भाष्य केले आहे.बॉबी देओल म्हणाला, "तो विषय आता संपला आहे. आम्ही मित्र आहोत. माझे मन दुखावले होते; कारण माझ्या कारकिर्दीच्या त्या टप्प्यावर, मला खरोखरच अशा एका चित्रपटाची नितांत गरज होती. इम्तियाज जेव्हा अभयसोबत 'सोचा ना था' हा चित्रपट बनवत होता, तेव्हापासूनच मी त्याच्यावर खूप विश्वास ठेवला होता. जेव्हा मी त्या चित्रपटाचा 'रफ कट' पाहिला, तेव्हा त्याच्या कामामुळे मी खूप प्रभावित झालो होतो. मी मनातल्या मनात विचार केला, 'तो किती हुशार दिग्दर्शक आहे! मी त्याच्यासोबत नक्कीच काम केले पाहिजे.'"बॉबी देओल पुढे म्हणाला, "ती पहिलीच वेळ होती जेव्हा आम्ही दोघांनी मिळून एक चित्रपट बनवण्याचे ठरवले होते. मात्र, जेव्हा तुमची मार्केट व्हॅल्यू फारशी नसते, तेव्हा तुम्हाला पाठिंबा द्यायला कोणीही तयार नसतं. हा चित्रपट प्रत्यक्षात आणण्यासाठी बराच संघर्ष केला, त्यासाठी खूप मोठा काळ निघून गेला. ज्या प्रॉडक्शन हाऊसकडे मी या चित्रपटाचा प्रस्ताव मांडला होता, त्यांनी दावा केला की इम्तियाज हा दिग्दर्शक म्हणून खूपच महागडा आहे. तरीही, त्याच प्रॉडक्शन हाऊसने पुढे जाऊन इम्तियाजसोबतच तो चित्रपट बनवला. विशेष म्हणजे, त्याच अभिनेत्रीला घेऊन बनवला जिची या प्रोजेक्टमध्ये सहभागी होण्यासाठी मीच मनधरणी केली होती. इनस्टंट बॉलिवूड पॉडकास्टला दिलेल्या मुलाखतीत बॉबी देओलने हा खुलासा केला.

सध्या बॉबी देओलचा अनुराग कश्यप दिग्दर्शित 'बंदर' हा चित्रपट रिलीजच्या वाटेवर आहे; हा चित्रपट 5 जून 2026 रोजी प्रदर्शित होणार आहे. याव्यतिरिक्त, बॉबी देओल 'रामायण', 'वेलकम टू द जंगल' आणि 'जना नायकन' या चित्रपटांमध्येही दिसणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पोलीस स्टेशन जानेफळची अवैध हातभट्टी दारू निर्मितीवर धडक कारवाई...



**जनसंचलन/बुलढाणा**

पोलीस स्टेशन जानेफळ हद्दीतील ग्राम पाथर्डी, ता. मेहकर येथे अवैधरित्या हातभट्टी दारूची निर्मिती व साठवणूक होत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन जानेफळचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने दिनांक ०३/०६/२०२६ रोजी छापा कारवाई केली. कारवाईदरम्यान आरोपी दत्ता उत्तम चव्हाण, वय ५२ वर्षे, रा. पाथर्डी ता. मेहकर, जि. बुलढाणा याच्या ताब्यातून व राहत्या परिसरातून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एकूण रु. १२,८२०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस स्टेशन जानेफळ येथे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सहकार विद्या मंदिरच्या एनसीसी कॅडेट्स ने जागतिक सायकल दिन उत्साहात साजरा केला

**जनसंचलन/बुलढाणा**




संयुक्त राष्ट्रांच्या () निर्देशानुसार, २०१८ पासुन दरवर्षी ३ जून रोजी जागतिक सायकल दिन जगभर साजरा केला जातो. या शुभप्रसंगी, माय भारत केंद्र बुलढाणा ने यावर्षी १३ महाराष्ट्र बटालियन खामगांव अंतर्गत येणाया सहकार विद्या मंदिर, बुलढाणा व जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा, भारत विद्यालय, बुलढाणा, एडेड हायस्कूल, बुलढाणा आणि शिवाजी हायस्कूल, बुलढाणा या संस्थांमधील कॅडेट्सच्या सहयोगाने जागतिक सायकल दिनाचे आयोजन केले. सकाळी ठिक ८.०० वाजता, जिल्हा युवा अधिकारी दीक्षा पोमन मॅडम, लेफ्टनंद पी.आर.ठाकरे आणि जिजामाता महाविद्यालयाचे असोसिएट अधिकारी लेफ्टनंद राजू हिवाळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. ही रॅली जिजामाता महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून निघून जयस्तंभ चौक, बुलढाणा पर्यंत गेली आणि त्यानंतर पुन्हा जिजामाता महाविद्यालयाच्या प्रांगणात परतली. कॅडेट्सनी (///) शिस्त आणि एकतेचे पालन करत, एकता व बंधुभावाचा संदेश सर्वत्र पोहोचवला. या रॅलीदरम्यान कॅडेट्स आणि सहभागींनी फिट इंडिया, मेक इन इंडिया, भारत माता की जय आणि वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. भारत सरकारचे निर्देश, माय भारत केंद्राच्या अधिकारी दीक्षा पोमन मॅडम, सहकार विद्या मंदिरच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर, जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन व्ही. चांगोले, कमांडिंग ऑफिसर कर्नल ओमेश शुक्ला, लेफ्टनंद कर्नल आनंद जोशी, स्टाफ टिकाराम थापा, लेफ्टनंद पी.आर. ठाकरे, लेफ्टनंद राजू हिवाले, जिल्हा युवा अधिकारी दीक्षा पोमन, वाकोडे सर आणि सहभागी झालेले सर्व कॅडेट्स यांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकायने आणि मार्गदर्शनाखाली ही सायकल रॅली अत्यंत सुरळीतपणे पार पडली.

# अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबविण्यासाठी निवेदन...



**जनसंचलन/ चिखली**

अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवून संविधानिक हक्कांचे संरक्षण करण्याबाबत चिखली येथील सर्व समाज बांधवाच्या वतीने मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना जिल्हाधिकारी बुलढाणा व तहसीलदार चिखली यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद असे की, भारतीय संविधानाचे निर्माते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षापासून उपेक्षित असलेल्या वर्गाला अनुसूचित जाती अशी ओळख देऊन संविधानाच्या कलम ३४१ नुसार शैक्षणिक व सामाजिक प्रगती होण्यासाठी प्रतिनिधित्व म्हणजे आरक्षण दिले आहे. हे आरक्षण देत असताना कोणताही घटक उपेक्षित राहू नये म्हणून सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर संधीची समानता देण्यात आली आहे.

भारतीय संविधानाच्या कलम १४ नुसार सर्वांना कायद्यासमोर समानता आणि समान संरक्षण दिले आहे. कलम १५(१) नुसार भेदभाव करण्यास मनाई व १६(१) नुसार समान संधीचा अधिकार देण्यात आलेला आहे.

अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण केल्यास भारतीय संविधानाच्या कलम १४ च्या समानतेच्या तत्वाच्या विरोध होईल . व कलम १५ (१) आणि १६ (१) नुसार राज्याला जातीनिहाय नवीन भेद निर्माण करण्याचा अधिकार नाही. जर असे होत असेल कलम ३४१ नुसार अनुसूचित जाती हा एक संघ घटनात्मक वर्ग आहे त्याचे अंतर्गत विभाजक करणे हे संविधानाच्या मूळ भावनेच्या विरोधात आहे. भारतीय संविधानाच्या संरक्षणासाठी व अनुसूचित जातीचे हक्क आणि अधिकार अबाधित ठेवण्यासाठी या निवेदनाद्वारे आम्ही समस्त आंबेडकरवादी जनता बुलढाणा हे अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाचा विरोध करीत आहोत.

संविधानाच्या कलम ३४१ अंतर्गत अनुसूचित जातींना दिलेला दर्जा हा सामाजिक न्याय, प्रतिनिधित्व आणि समान संधी यासाठीचा मूलभूत अधिकार आहे. परंतु महाराष्ट्र शासन अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या दिशेने पावले उचलत असून त्यामुळे अनुसूचित जातीसमूहांमध्ये फ ूट पाडण्याचे षडयंत्र सुरू आहे. अनुसूचित जातींना न्याय देण्याऐवजी जाती-जातीत संघर्ष निर्माण करून सामाजिक ऐक्य कमकुवत करण्याचे काम शासनाकडून होऊ नये. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी शासनाने ठोस धोरण राबवावे; परंतु उपवर्गीकरणाच्या माध्यमातून संविधानिक एकात्मतेवर घाव घालू नये.

# माझे गाव आरोग्य संपन्न गावकृतीदल समितीची सभा संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**




माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत कृतीदल समितीची सभा गटविकास अधिकारी बी. बी. हिवाळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेमध्ये विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. सर्व राष्ट्रीय कार्यक्रमांची उद्दिष्टे शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी ग्रामस्तरावर उत्कृष्ट कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच विविध कार्यक्रमांचे अहवाल व ऑनलाइन रिपोर्ट वेळेत व अद्यावत ठेवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आयुष्मान भारत कार्ड व आयुष्मान वय वंदना कार्ड १०० टक्के काढण्याबाबत विशेष भर देण्यात आला. यासाठी सर्व वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करून पात्र लाभार्थ्यांचे शंभर टक्के कव्हरेज पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सदर सभेस सहाय्यक गटविकास अधिकारी आरबी शेख, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्नेहा पाटील, गटशिक्षण अधिकारी अशोक लांजुळकर, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती देशमुख, विस्तार अधिकारी डी. एस. इंगळे, प्रभाती माळी, सामाजिक कार्यकर्ता सौरभ मुकुंद, उपअभियंता (पाणीपुरवठा विभाग), प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. एल. ए. जैस्वाल, डॉ. पूजा मुळे, डॉ. संकेत चव्हाण तसेच तालुका आरोग्य सहाय्यक जी. एस. डांगे उपस्थित होते. सभेच्या शेवटी विविध विभागांमध्ये समन्वय वाढवून आरोग्यदायी व निरोगी गाव निर्मितीसाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

# शिंदेंच्या शिवसेनेकडून डॅमेज कंट्रोलचे प्रयत्न, ठाण्यात राजकीय हालचालींना वेग....

**वृत्तसंस्था/ ठाणे**

महाराष्ट्र राज्य विधान परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी ठाणे मतदारसंघातून महायुतीच्या वतीने रिंगणात असलेले शिवसेनेचे उमेदवार रवींद्र फाटक यांनी भाजपचे आमदार संजय केळकर यांची भेट घेतली. फाटक यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना महायुतीचा घटकपक्ष असलेल्या भाजपमधील स्थानिक पदाधिकाऱ्यांची गैरहजेरी चर्चेत होती. त्यामुळे डॅमेज कंट्रोल म्हणून शिवसेनेकडून या भेटीगाठींच्या सत्रांना वेग आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महायुतीकडून शिवसेनेचे रवींद्र फाटक तसेच महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ठाणे महापालिकेचे गटनेते अभिजित पवार एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. फाटक यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपचे माजी खासदार कपिल पाटील, आमदार कुमार आयलानी आणि माधवी नाईक उपस्थित होते. मात्र भाजपचे स्थानिक आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे यांच्यासह भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, वनमंत्री गणेश नाईक या भाजपच्या नेत्यांच्या गैरहजेरीची चर्चा दबक्या आवाजात सुरु होती. त्यात महायुतीमधील धुसफूस आमच्या कामी येईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार



पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मविआ उमेदवार अभिजित पवार यांचा अर्ज दाखल करताना व्यक्त केला होता. आव्हाड यांच्या सूचक वक्तव्याने महायुतीतील नाराजी अधोरेखित होत असतानाच मंगळवारी रात्री फाटक यांनी भाजपच्या केळकर यांची भेट घेत संवाद साधला. यावेळी भाजपचे नगरसेवक अमित सरैय्या उपस्थित होते. या भेटीला विविध सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. जनहिताच्या कामांना अधिक गती देण्यासाठी आणि विकासाचा प्रवास अधिक सक्षम करण्याबरोबर भविष्यातील उपक्रमांबाबत सकारात्मक संवाद या प्रसंगी साधल्याचे फाटक यांनी सांगितले. मी अर्ज दाखल केला. तेव्हा भाजप आमदार निरंजन डावखरे महायुतीचे उमेदवार अनिकेत तटकरे यांचा अर्ज दाखल करण्यासाठी गेले होते. या पार्श्वभूमीवर आमची चर्चा झाली असून महायुतीत कोणताही बेबनाव नसल्याचे फाटक यांनी स्पष्ट केले. दरम्यान, विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीत अनेक ठिकाणी बंडखोरी होताना बघायला मिळाली. ही बंडखोरी रोखणं वरिष्ठांपुढे मोठं आव्हान होतं. पण नाशिक वगळता इतर ठिकाणचे बंड शमवण्यात महायुतीच्या नेत्यांना बऱ्यापैकी यश आलं आहे. दुसरीकडे ठाणे हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानला जातो. असं असलं तरी इथे भाजप आणि शिवसेना यांच्यात शीतयुद्ध सुरु असल्याचं लपून राहिलेलं नाही. वनमंत्री गणेश नाईक यांनी इथे जनता दरबार घेण्यापासून ते शिंदेंवर टीका करणं, अशा घटना सातत्याने घडत आलेल्या आहेत. यामुळे ठाण्याच्या विधान परिषदेच्या जागेकडे राज्याचं लक्ष लागणार आहे.

# विधानपरिषद निवडणूक बिनविरोध होणार? औपचारिक लढतीत अर्थ नाही, शेवटच्या क्षणी बावनकुळेंचं काँग्रेसला महत्त्वाचं आवाहन!

**वृत्तसंस्था/ नागपूर**

विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीकडे स्पष्ट संख्याबळ असल्याचा दावा करत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाविकास आघाडीला उमेदवारीबाबत पुनर्विचार करण्याचं आवाहन केलं आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संख्याबळाचा विचार करून निर्णय घेतल्यास महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बिनविरोध निवडणुका होऊ शकतात, असे बावनकुळे म्हणाले. बावनकुळे म्हणाले की, महायुतीमधील सर्व अपक्ष उमेदवारांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच विविध पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी चर्चा केली आहे. ज्या ठिकाणी अपक्ष उमेदवार महायुतीच्या अधिकृत उमेदवारांविरोधात मैदानात आहेत, तेथे त्यांचे अर्ज मागे घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महायुतीतील सर्व घटक पक्षांचे अध्यक्ष याबाबत योग्य निर्णय घेतील आणि मोठ्या प्रमाणात बंडखोरी होणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, काँग्रेसलाही आम्ही विनंती केली आहे की, ज्या मतदारसंघात त्यांच्याकडे लढत देण्याइतके संख्याबळ नाही, तेथे निवडणूक बिनविरोध करण्याचा विचार करावा. सध्या राज्यात तीव्र उन्हाळा असून अनेक भागांत पेट्रोल-डिझेलच्या उपलब्धतेचे प्रश्न आहेत. अशा परिस्थितीत केवळ औपचारिक लढतीसाठी निवडणूक घेण्यात काही अर्थ नाही. ही निवडणूक जनतेची थेट निवडणूक नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांच्या संख्याबळावर निकाल ठरतो. ज्या पक्षाकडे जास्त सदस्य आहेत, त्या पक्षाचा उमेदवार विजयी होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे अनेक मतदारसंघांतील चित्र आधीच स्पष्ट आहे, नागपूर, भंडारा, अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्रातील विधानपरिषद निवडणुकीत सर्व १७ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होतील, असा विश्वास व्यक्त केला.



यवतमाळमधील काँग्रेसच्या उमेदवाराने निवडणूक अर्ज मागे घेतल्याच्या निर्णयावरही चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपली भूमिका मांडली. काँग्रेसचे उमेदवार सुद्धा हा विचार करतील की ही निवडणूक लढवून त्यांना काय उपयोग आहे, केवळ हरण्यापुरतं लढायचं का, त्यामुळे उमेदवारही विचार करतो, उमेदवाराला लढावं लागतं, ७०० मतं आणि २०० मतं एवढा फरक आहे तर कशाला लढायचं? असा प्रश्न उमेदवारांना पडला असेल, असं ते म्हणाले. दरम्यान, विदर्भातील पाचही जागांवर महायुतीचा विजय निश्चित असल्याचा दावा करत बावनकुळे यांनी म्हणाले की, निवडणूक तशी एकतर्फी आहे, बंटी भांगडीया यांनी वर्धा चंद्रपूर गडचिरोलीमधील निवडणूक आपल्या हातात घेतली आहे. भंडाऱ्याची निवडणूक परिणय फुके पाहतात, मी विदर्भातील निवडणूक पाहतोय त्यामुळे विदर्भातील पाचही जागा महायुती जिंकेल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८